नि. फौ. ख. क्र.२०४/२०१६ निशाणी २८

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – हरिदास ज्ञानदेव कुचके

वय – ५१ वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – हाता, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकार तर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. आर.लोखंडे यांचा दुपारी ०३.३० वाजता पुकारा केला गैरहजर, न्यायालया मार्फत सरतपास सुरुः**

१. मी आरोपी व फिर्यादीला ओळखतो. फिर्यादी माझा साळा असुन आरोपी माझा चुलत भाऊ आहे. सुमारे १० वर्षापुर्वी अमोल इंगळे आणि किशोर कुचके यांचेत शेतीचा व्यवहार झाला होता. किशोर कुचकेची २ एकर शेती माझा साळा अमोल इंगळे घेणार होता. सदर व्यवहारा संदर्भांत अकोला येथील वकील देहलीवाले यांचेकडे ईसार पावती केली होती. त्यांचेत प्रत्येकी रु. ६ लाख एकर असे एकुण २ एकरचे रु. १२ लाख देण्याचे ठरले. ईसार पावती करतांना रु. २ लाख अमोल इंगळेने किशोर कुचकेला दिले होते. उर्वरित रक्कम खरेदीच्या दिवशी देण्याचे ठरले होते. किशोर कुचकेने अमोल इंगळेला खरेदी करुन दिली नाही. अमोल इंगळे कडुन किशोर कुचकेने टप्या टप्याने एकुण रु. ११,५०,०००/– घेतले होते, परंतु खरेदी करुन दिली नाही. अमोल इंगळेने मला फोनवर आरोपी खरेदी का करुन देत नाही, त्याबद्दल विचारणा करायला सांगितले. म्हणुन मी किशोर कुचकेला विचारले असता त्याने सदरचे शेत जिगांव प्रकल्पात गेलेले आहे त्यामुळे त्याची खरेदी होत नाही, मी पैसे परत करतो असे सांगितले. अमोल इंगळे कडुन घेतलेल्या रकमेपैकी किशोर कुचकेने रु. ५ लाख परत केले, परंतु उर्वरित रक्कम परत केली नाही. म्हणुन अमोल इंगळेने त्याचे विरुध्द रिपोर्ट दिला. सदर घटनेनंतर पोलीसांनी माझ्याकडे गुन्हया संदर्भात चौकशी केली होती. मी आरोपीला ओळखतो.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.ए.डी.निंबाळकर यांच्या मार्फत</u>**

२. अमोल इंगळेने रिपोर्ट दिल्यानंतर पोलीस माझ्याकडे चौकशीसाठी २–३ दिवसांनी आले होते. रिपोर्ट दिला त्या दिवशी पोलीसांनी माझ्याकडे विचारपुस केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, किशोर कुचके आणि मी एकाच गावात राहत असल्यामुळे आणि तो माझा नातेवाईक असल्याने त्याच्याकडे किती शेती आहे हे मला माहित आहे. जिगांव प्रकल्प सुरु झाला त्यावेळी गावात नोटीस लागल्या होत्या किंवा कसे मला माहित नाही. माझ्याकडे १० एकर शेती असुन सदर शेती हाता येथे आहे. माझ्याकडील शेती संदर्भात परिपत्रक आल्यास त्याची मला माहिती होईल. अमोल इंगळे याच्याकडे त्याच्या गावी तुरखेड, ता. अंजनगाव, जि. अमरावती येथे ५ एकर शेती आहे.

३. अमोल इंगळे आता हयात नाही. ते कोरोना काळात मयत झाले आहेत. माझा साळा तुरखेड येथील रहिवासी होता. तुरखेड पासुन हाता गावचे अंतर ६०–६५ कि.मी.इतके आहे. अमोल इंगळे पुणे येथे नोकरीवर असल्याने त्याची आर्थिक परिस्थिती चांगली होती. हे म्हणणे खरे नाही की, अमोल इंगळे एकरकमी रु. १०–१२ लाख देवु शकत होता. हे म्हणणे खरे नाही की, अमोल इंगळे आणि किशोर कुचके यांचेत शेती खरेदीचा व्यवहार झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अमोल इंगळेने ईसार पावतीच्या दिवशी रु. २ लाख दिले आणि उर्वरित रक्कम खरेदीच्या दिवशी देण्याचे ठरले होते मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने अमोल इंगळेला खरेदी करुन दिली नाही आणि त्याचेकडुन किशोर कुचकेने टप्या टप्याने एकुण रु. ११,५०,०००/– घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला त्याबद्दल अमोल इंगळेने विचारणा करायला सांगितले, म्हणुन मी किशोर कुचकेला विचारल्यावर त्याने सदरचे शेत जिगांव प्रकल्पात गेलेले आहे त्यामुळे त्याची खरेदी होत नाही असे सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अमोल इंगळेने खोटा रिपोर्ट दिला होता.

४. मी माझे बयानात अमोल इंगळे आणि किशोर कुचके यांच्यात प्रत्येकी रु. ६ लाख एकर असे एकुण २ एकरचे रु. १२ लाख देण्याचे ठरले, ईसार पावती करतांना रु. २ लाख अमोल इंगळेने किशोर कुचकेला दिल्याचे, तसेच अमोल इंगळेने मला

फोनवर आरोपी खरेदी का करुन देत नाही, त्याबद्दल विचारणा करायला सांगितले, म्हणुन मी किशोर कुचकेला विचारल्यावर त्याने सदरचे शेत जिगांव प्रकल्पात गेलेले आहे त्यामुळे त्याची खरेदी होत नाही, मी पैसे परत करतो असे सांगितले होते. सदर मजकुर माझे बयानात नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.12.12 16:54:49 +0530

बाळापूर.
दि.१२/१२/२०२५

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर